
# करोनाच्या काळात स्वयंपाक!

भारतीय वैज्ञानिकांचा कोविड-१९ आह्वानाला प्रतिसाद
स्वप्रेरित अनौपचारिक समूह


IndiSciCovid

https://indscicov.in/




Indian Scientists' Response to COVID-19

संध्याकाळ झाली होती, आणि मला कधीचीच भूक लागली होती. “आप्पा, प्लीज तुमची खास चिकनकरी कराल का आज? चांगली झणझणीत आणि मसालेदार करा काय!” मी म्हणालो. आई पण खूष होऊन म्हणाली, "करा नं प्लीज, आज मी खूप दमले आहे."



“ठीक आहे,” आप्पा म्हणाले, आणि साबणानं आपले हात धुण्यासाठी सिंककडे गेले. मी २० .. १९ .. १८ .. अशी उलटी मोजणी सुरू केली, आई पण त्यात सामील झाली. आप्पांना रेडिओशेजारी जमिनीवर बसून भाजी चिरायला आवडतं. त्या दिवशी सकाळी रमेशकाका आम्हाला वाचायला द्यायला मासिके घेऊन आले होते, आणि त्याच ठिकाणी बसले होते. आप्पांनी ती जागा स्पंज आणि साबणपाण्यानं पुसून स्वच्छ केली होती. आप्पा बसले आणि आधी चिकन आणि मग हिरव्या मिरच्या चिरायला लागले. "आणखी थोड्या, आणखी थोड्या!" मी खुशीत म्हणालो.



"काय महाराज, कांदे चिरणार का?" आप्पांनी विचारलं. "अरे बाप रे, नको रे बाबा .. माझ्या डोळ्यांना झोंबतं!" मी म्हणालो. मग त्यांनी तीन कांदे स्वच्छ धुवून सोलले. तेवढ्यात शेजारची सरलाकाकू दाराबाहेरूनच आईला म्हणाली, "अगं, तुला ठाऊक आहे का माझ्या बहिणीनं काय केलं? खबरदारी म्हणून कांदे-टोमॅटो पण साबणानं धुवून घेतले, आणि त्या दिवशी सगळ्यांचं साबणाचं जेवण झालं!" साबणाचं जेवण या कल्पनेची मला भयंकर गम्मत वाटली आणि हसू आलं.

आई मला म्हणाली, "हा विषाणू अन्नावर वाढत नाही, आणि तसाही शिजवल्यावर नष्टच होतो हे तुला ठाऊक आहे नं?" मला अर्थातच हे माहित होतं. "पण कांदा तर बाजारात उघड्यावर पडलेला असतो, आणि सगळ्यांचे हात त्याला लागतात. हो की नाही गं आई?" मी म्हणालो. "हो रे बाळा," आई हसून म्हणाली, "म्हणून तर तुझ्या भावानं काल भाजी आणल्यावर मी सगळी नीट धुवून स्वच्छ करून ठेवली नं ..." मग आम्ही दोघंही मंत्र म्हटल्यासारखे एकदम म्हणालो, "... आणि आपले हात २० सेकंद साबण लावून नीट धुतले!"



दारातूनच सरलकाकू आप्पा काय करतात बघत होती. ती म्हणाली, "अरे वा, आज चिकनचा बेत दिसतोय. पण मी तर व्हाट्सअपवर वाचलं की हा विषाणू प्राण्यांकडून आला म्हणून. मग चिकन चालेल का?" आप्पा ठासून म्हणाले, "हो, हो, नक्कीच! कारण हा विषाणू माणसाकडून माणसाकडे जातो. चिकन आणि नॉनव्हेज सगळं एकदम सुरक्षित आहे. अहो मी नाही, डॉक्टर म्हणतात असं!" "नशीब माझं चांगलं!" मी मनातल्या मनात म्हणालो. तेवढ्यात सरलाकाकूला तिच्या मुलीनं हाक मारली आणि ती परत गेली.

इतक्यात शेखरदादा पण दुकानातून तांदूळ आणि तूरडाळ घेऊन परत आला. माझ्यासाठी बिस्किटं आणायला विसरला नव्हता. आत येऊ का नको, येऊ का नको, करत दाराशीच घुटमळत थांबला होता. तर आई म्हणाली, "अरे एवढं गोंधळून जायला काय झालं? तिथेच थांब, आलेच मी!" आणि स्वयंपाकघरातून डाळतांदूळाचे मोठे डबे आणि आणखी एक डबा घेऊन दाराशी गेली. ते उघडून दादाला म्हणाली, "आता एकेक पिशवी उघड, आणि डब्याला हात किंवा पिशवी लागू न देता डब्यात ओत!" वर त्याला जामलं, "सांडलंस तर बघ बरं का ..." यावर मी खिदळलो आणि दादा सगळं आईनं सांगितल्यासारखं काळजीकाट्यानं करतो का ते बघत बसलो. शेवटी त्यानं बिस्किटाचा पुडा उघडून डब्यात बिस्किटं ओतली, आणि खूष होऊन म्हणाला, "येस! जम्या आप्पूनकू!" कधी कधी असला फालतूपणा करतो ना, की सगळ्यांना हसूच येतं. सकाळी सरलाकाकूनं बटाट्याचा फर्मास रस्सा आणून दिला होता, तेव्हा आईनं तो पण असाच दारातच आपल्या भांड्यात तिच्याकडून ओतून घेतला होता.




"या प्लास्टिकचं काय करायचं गं आई?" दादानं तिथूनच विचारलं. "तिथल्याच कचऱ्याच्या डब्यातल्या प्लास्टिकच्या पिशवीत टाक" आई म्हणाली. चपला तिथेच काढून दादा आत आला. "आता २० सेकंद हात धुवायचे! काय?" मी फर्मान सोडलं आणि तो तसं करतो ना ते बघायला त्याच्या मागे गेलो. हात धुवून झाल्यावर दादा कपडे बदलायला गेला.

तोपर्यंत आप्पा चिराचिरी संपवून स्वयंपाकघरात गेले होते. थोड्या वेळापूर्वीच त्यांनी सगळी भांडी-चमचे-डाव-उलथनी एवढंच काय कट्टा आणि गॅस शेगडी पण साबणापाण्यानं स्वच्छ करून ठेवली होती. लवकरच घरभर हिंग-कडीपत्ता-कांदा-लसूण फोडणीचा घमघमाट सुटला. आप्पांनी त्यात चिकनचे तुकडे शिजायला घातले. आई तिकडे बाहेरच्या खोलीत टीव्हीसमोर बसली होती. तिला म्हणाले, "तुला शेजारच्या बिल्डिंगमधल्या जेकबचं कळलं का? त्याला सर्दी-पडसं-खोकला झालाय. बारीक ताप पण आला होता गेल्या आठवड्यात."

"अरे देवा! कठीण असेल नं किती त्यांच्यासाठी ... आपण जायचं का भेटायला?" शेखरदादानं विचारलं. आई मान हलवून म्हणाली, "नाही रे, ते सगळे सध्या क्वारंटाईनमधे असतील." "जेकब एकटा एकटा जेवत असेल का गं आई? त्याला चिकनकरी चालेल का गं?" मी आईला विचारलं. "हो, चालेल की, नक्की चालेल!" आई म्हणाली, "पण त्यांना सगळ्यांना खूप काळजी घ्यावी लागेल थोडे दिवस. त्याला त्याच्या खोलीतच राहावं लागेल, कुणालातरी त्याला ताटात अन्न वाढून नेऊन द्यावं लागेल, त्याचं जेवण झाल्यावर ताट तसंच बराच वेळ ठेवून मग धुवावं लागेल." जेकबला पटकन बरं वाटू दे. मला तो पतंग उडवायला शिकवणार आहे.

"जेवण तैयार!" आप्पांची आरोळी आली. त्यांनी आम्हाला सगळ्यांना आधी हात स्वच्छ धुवायला लावले, मग आमच्या ताटांमधे चिकनकरी आणि भात वाढला. "तुम्ही नाही जेवणार?" मी विचारलं. "एक मिनिट,



एक मिनिट!" असं म्हणून त्यांनी आधी आपलं नाक जोरजोरात खाजवलं. "हुश्श ... गेला तासभर मला हे करायचं होतं, पण स्वयंपाक करत होतो नं, मग कसं खाजवणार?" यावर आईसकट आम्ही सगळे पोट धरून हसलो, आणि आप्पा परत एकदा हात धुवायला गेले. एकमेकांपासून पुरेसं दूर बसून गेल्या दहा हजार वर्षांत झाली नसेल अशी फर्मास चिकनकरी त्या दिवशी आम्ही पोटभर चापली.

विज्ञानसिद्ध यथातथ्य माहिती लोकांपर्यंत पोचावी म्हणून "भारतीय वैज्ञानिकांचा कोविड-१९ आह्वानाला प्रतिसाद" या स्वप्रेरित अनौपचारिक समूहाकडून ही कथा उपलब्ध करण्यात आली आहे. अशा स्वरूपाच्या आणखी उपयुक्त आणि निःशुल्क माहितीकरता इंटरनेटवर www.indscicov.in इथे जावे.

